## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-** १) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, साकीनाका पोलिस स्टेशन, मुंबई यांचा दि.२८/०२/२०११ रोजीचा अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२४/२०११/जा.२०९, दि.१७/०३/२०११, २८/०३/२०११ व २०/०४/२०११.

३) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, साकीनाका पोलिस स्टेशन यांचे दि.१९/०४/२०११ रोजीचे अभिवेदन.

४) ॲड. एच.एस. आनंद यांनी त्यांचे अशिल गाळा क्र. ७ व १२ चे मालक विकास सिंग तसेच इस्तियाक अहमद अजिउल्ला सिध्दीकी यांचे वतीने दिनांक १९/०४/२०११ रोजी टपालामार्फत सादर केलेले स्वतंत्र लेखी निवेदने.

५) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, साकीनाका पोलिस स्टेशन यांचे दि.०४/०७/२०११ रोजीचे पत्र.

६) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२४/२०११/जा.६०९, दि.२९/०७/२०११,

७) गाळा क्र. ७ व १२ चे मालक विकास साधू सिंग तसेच इस्तियाक अहमद अजिउल्ला सिध्दीकी यांचे दिनांक ०९/०८/२०११ रोजीची स्वतंत्र लेखी निवेदने.

८) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, साकीनाका पोलिस स्टेशन यांचे दि.०९/०८/२०११ रोजीचे अभिवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२४/२०११/जा ६६६
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : १८/०८/२०११.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

समिता कॉम्पलेक्स, बिल्डिंग नं. १५, साकीनाका, मुंबई- ७२ या ठिकाणी लुब्रिकेटिंग ऑईलचा अवैध विनापरवाना साठा करुन ठेवला असल्याची खात्रीलायक खबर दिनांक ३१/०१/२०११ रोजी साकीनाका पोलीस स्टेशनला मिळाल्यावरुन तेथील अधिकारी दोन पंचासह उक्त ठिकाणी गेले. अधिकारी वर्ग सदर ठिकाणी गाळा नंबर ७ समोर आले असता, एक इसम सदर गोडावून समोर हजर होता. त्यास त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव इस्तियाक अहमद अजिउल्ला सिद्दीकी असे सांगितले.

त्याचेकडे लुब्रिकेटिंग ऑईलच्या साठ्याबाबत परवाना आहे काय? याबाबत विचारणा केली असता त्याने सदर गोडावूनमध्ये साठा केलेल्या ऑईलबाबत परवाना नसल्याचे सांगितले. सदरचा साठा हा त्याने अवैधरित्या विनापरवाना करुन ठेवल्याची नमूद पथकाची खात्री झाल्याने त्याच्या संमतीने गोडावूनची खात्री केली असता, गोडावूनमध्ये प्रत्येकी २०० लिटर क्षमतेचे एकूण ५७ लोखंडी पत्र्याचे बॅरल असे ११४०० लिटर लुब्रिकेटिंग ऑईलचा साठा आढळून आला. येणे प्रमाणे वर नमूद वर्णनाचा माल इसम नामे इस्तियाक अहमद अजिउल्ला सिद्दीकी याचेसह पुढील कार्यवाहीकरिता ताब्यात घेण्यात आला.

ताब्यात घेतलेल्या इसमाकडे अधिक चौकशी केली असता, समिता कॉम्पलेक्स बिल्डिंग नं. १३, गाळा नं. १२, साकीनाका, मुंबई - ७२ येथील गोडावूनमध्ये सुध्दा लुब्रिकेटिंग ऑईलचा अवैधरित्या साठा करुन ठेवल्याचे सांगितल्याने सदर ठिकाणी जावून अधिकाऱ्यांनी गोडावूनची तपासणी केली असता गोडावूनमध्ये प्रत्येकी २०० लि. क्षमतेचे एकूण ५२ लोखंडी पत्र्याचे बॅरल असे एकूण १०४०० लिटर लुब्रिकेटिंग ऑईलचा साठा आढळून आला.

अशाप्रकारे सर्व संबंधितांनी संगणमत करुन सदर गोडावूनमध्ये लुब्रिकेटिंग ऑईल सारख्या तेलाचा बेकायदेशीर साठा करुन गैरव्यवहार करीत असल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द (१) दि ल्युब्रिकेटींग ऑईल ॲण्ड ग्रिसेस प्रोसेसिंग सप्लाय ॲण्ड डिस्ट्रीब्युशन ऑर्डर - १९८७ चे कलम ३, ४ सह (२) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७(२), ८ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द साकीनाका पोलिस स्टेशन, मुंबई येथे स्था. गुन्हा नोंद क्र. ०७/२०११, दि.०१/०२/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | गाळा क्र. ७ मधील प्रत्येकी २०० लिटर क्षमतेचे एकूण ५७ लोखंडी पत्र्याचे बॅरल त्यात ल्युब्रिकेटिंग ऑईलचा साठा | ११४०० लिटर | ३,९९,०००/- |
| २ | गाळा क्र. १२ मधील प्रत्येकी २०० लिटर क्षमतेचे एकूण ५२ लोखंडी पत्र्याचे बॅरल त्यात ल्युब्रिकेटिंग ऑईलचा साठा | १०४०० लिटर | ३,६४,०००/- |
| | | एकूण | ७,६३,०००/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती वरिष्ठ पोलीस निरीक्षक, साकीनाका पोलिस स्टेशन, मुंबई यांनी वाचावे क्र.१ मध्ये नमूद अहवालान्वये केली असून त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का

करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दि. २५/०३/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक २५/०३/२०११ रोजीच्या सुनावणीस आरोपी/अपचारी तसेच तपासी पोलीस अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची एक संधी म्हणून पुढील सुनावणी दि.०१/०४/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०१/०४/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलीस अधिकारी तथा पोलीस उप निरीक्षक श्री अशोक टी. पारधी उपस्थित राहीले. तसेच सदर सुनावणीस गाळा नं.१२ चे मालक विकास सिंग उपस्थित राहीले व त्यांनी सुनावणीची पुढील तारीख मिळावी म्हणून लेखी विनंती केली. सबब, सदरची सुनावणी स्थगीत करुन पुढील सुनावणी दि.१९/०४/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १९/०४/२०११ रोजीच्या सुनावणीस साकीनाका पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार श्री ए. एन. महामुनकर उपस्थित राहीले व त्यांनी वाचावे क्र. ३ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. तथापी, सदर सुनावणीस आरोपी/अपचारी उपस्थित राहीले नाहीत. सबब, सदरची सुनावणी स्थगीत करुन पुढील सुनावणी दिनांक २९/०४/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २९/०४/२०११ रोजीच्या सुनावणीस गाळा क्र. ७ व १२ चे मालक विकास सिंग तसेच इस्तियाक अहमद अजिउल्ला सिध्दीकी हे उपस्थित राहीले व त्यांनी वाचावे क्र. ४ अन्वये टपालामार्फत स्वतंत्र लेखी निवेदने सादर केले.

प्रस्तुत प्रकरणी जप्त केलेला द्रव पदार्थ कोणत्या प्रकारचा आहे ? तसेच त्यात भेसळ होती किंवा कसे ? याकरीता रासायनिक पृथःकरण अहवालाची अत्यंत आवश्यकता असल्याचे सदरचा पृथःकरण अहवाल प्राप्त होईपर्यंत प्रकरण अंतिम निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

& DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFF MBAI

तद्नंतर जप्त केलेल्या द्रवपदार्थाच्या नमुन्यांचा रासायनिक पृथःकरण अहवाल, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, साकीनाका पोलिस स्टेशन यांनी त्यांचे वाचावे क्र.५ अन्वये या कार्यालयास सादर केला आहे. रासायनिक पृथःकरण अहवालाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे सादर करण्याची संधी म्हणून वाचावे क्र. ६ अन्वये नोटीस बजावून पुढील सुनावणी दिनांक ०९/०८/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०९/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस गाळा क्र. ७ व १२ चे मालक विकास साधू सिंग उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे तसेच इस्तियाक अहमद अजिउल्ला सिध्दीकी यांच्या प्राधिकारपत्रासह त्यांचे वाचावे क्र. ७

अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केले. सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी उपस्थित राहिले नाहीत. तथापी, दरम्यान त्यांनी त्यांचे अभिवेदन वाचावे क्र. ८ अन्वये टपालामार्फत सादर केले.

सबब, प्रकरण निर्णयास्तव राखीव ठेवण्यात येत आहे.

## युक्तिवाद :-

ॲड. एच.एस. आनंद यांनी त्यांचे अशिल गाळा क्र. ७ व १२ चे मालक विकास साधू सिंग यांचे वतीने टपालामार्फत सादर केलेल्या लेखी निवेदनात, गाळा क्र. ७ हा विकास सिंग यांनी श्रीमती मनीषा पी. शहा आणि श्रीमती चेतना एम. शहा यांचेकडून भाडेतत्वावर घेतला असून, तसा भाडे करारनामा केलेला आहे. तसेच गाळा क्र.१२ हा विकास सिंग यांचे मालकीचा आहे. त्यांनी दोन्ही गाळे इस्तियाक अहमद यांना जानेवारी २०१० पासून केअरटेकर बेसीस करारावर वापरावयास दिले आहे. तसेच इस्तियाक हा सदर गाळ्यात ल्युब्रिकेटिंग ऑईलचा व्यवसाय करीत असून त्यात काहीही प्रकारचे तो त्यात भेसळ करीत नाही, असे नमूद केले आहे.

ॲड. एच.एस. आनंद यांनी त्यांचे अशिल इस्तियाक अहमद अजिउल्ला सिध्दीकी यांचे वतीने टपालामार्फत सादर केलेल्या लेखी निवेदनात, प्रस्तूत गुन्ह्यात पोलिसांनी त्यांचे अशिलावर जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३ व ४ तसेच ल्युब्रिकेंटिग ऑईल व ग्रीसेस आदेश, १९८७ चे कलम लावलेले आहेत. परंतू तो अधिकृतपणे ल्युब्रिकेंटिग ऑईल ट्रेडिंगचा व्यवसाय करीत असल्यामुळे त्याच्यावर हे कलम लागू होत नाहीत. त्यासंदर्भात त्यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी केस नं. २००२ बाम्बे सीआर (क्री) १७० मध्ये दिलेल्या निर्णयाचा उल्लेख केलेला आहे. तसेच त्यांच्या अशिलाकडे सदर ट्रेडर्स व्यवसायाकरीता आवश्यक ते परवाने आहेत. सदर गुन्ह्यात ऑईल भेसळ करत असल्याबाबत पोलीसांकडे कोणताही पुरावा नाही. तरी सदर गुन्ह्यात जप्त केलेला मुद्देमाल त्यांच्या अशिलास परत मिळावा, असे नमूद केले आहे.

तद्नंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक, साकीनाका पोलीस स्टेशन यांनी रासायनिक पृथ:करण अहवालाच्या अनुषंगाने दिनांक ०९/०८/२०११ रोजी टपालामार्फत सादर केलेल्या अभिवेदनात, सदर गुन्ह्यात जप्त केलेला मुद्देमाल ल्युब्रिकेटींग ऑईल अटी व शर्तीच्या अधीन राहून अर्जदारास देण्यास त्यांची काहीही हरकत नसल्याचे नमुद केले आहे.

दिनांक ०९/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित गाळा नं. ७ व १२ चे मालक विकास साधू सिंग यांनी युक्तिवाद केला की, गाळा क्र. ७ हा त्यांनी श्रीमती मनीषा पी. शहा आणि श्रीमती चेतना एम. शहा यांचेकडून भाडेतत्वावर घेतला असून, तसा भाडे करारनामा केला आहे. तसेच गाळा क्र.१२ हा त्यांचे मालकीचा आहे. दोन्ही गाळे इस्तियाक अहमद यांना जानेवारी २०१० पासून केअरटेकर बेसीस करारावर वापरावयास दिले आहे. सदर

गुन्ह्यात जप्त केलेल्या मुद्देमालाच्या रासायनिक पृथ:करण अहवालात स्पष्ट नमुद केले आहे की, तो ल्युब्रीकेटींग ऑईल आहे. त्यामुळे या गुन्ह्यात ऑईलमध्ये भेसळ करण्याचा अथवा काळाबाजार करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तरी जप्त केलेला ल्युब्रीकेटींग ऑईलचा संपुर्ण साठा परत मिळावा, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

तसेच इश्तीयाक अहमद अजीजुल्लाह सिध्दीकी यांचे प्राधिकारपत्रासह उपस्थित विकास सिंग यांनी सादर केलेल्या इश्तियाक अहमद यांचे लेखी निवेदनात, गाळा नं. ७ व १२ ही दोन्ही गाळे केअरटेकर बेसीस करारावर जानेवारी २०१० पासून वापरावयास घेतले आहे. याबाबत यापूर्वीच कागदपत्र सादर केली आहेत. सदर गुन्ह्यात जप्त केलेल्या मुद्देमालाच्या रासायनिक पृथ:करण अहवालात स्पष्ट नमुद केले आहे की, तो लुब्रीकेटींग ऑईल आहे. त्यामुळे या गुन्ह्यात ऑईलमध्ये भेसळ करण्याचा अथवा काळाबाजार करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तरी जप्त केलेला लुब्रीकेटींग ऑईलचा संपुर्ण साठा परत मिळावा, असे नमूद केले आहे.

## निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचे निवेदन, तपासी पोलीस अधिकारी यांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी दिनाक ३१/०१/२०११ रोजी साकीनाका पोलीस स्टेशन यांना मिळालेल्या बातमीनुसार तेथील अधिकाऱ्यांनी समिता कॉम्पलेक्स, गाळा नंबर ७ बिल्डिंग नं. १५, साकीनाका, मुंबई- ७२ या ठिकाणी पंचासह गेले असता, तेथे ल्युब्रीकेटींग ऑईलचा साठा आढळून आला. सदर साठ्याबाबत तेथे उपस्थित इस्तियाक अहमद अजिउल्ला सिद्दीकी या इसमाकडे विचारणा केली असता, त्याने सदर गोडावूनमध्ये साठा केलेल्या ऑईलबाबत परवाना नसल्याचे सांगितले. तद्‌नंतर त्या ठिकाणी असलेल्या गाळा नं. १२ ची तपासणी केली असता, त्या गाळ्यामध्ये सुध्दा ल्युब्रीकेटींग ऑईलचा साठा आढळून आला. सदरचा साठा हा त्याने अवैधरित्या विनापरवाना करुन ठेवल्याची नमूद पथकाची खात्री झाल्याने गाळा नं ७ मधील प्रत्येकी २०० लिटर क्षमतेचे एकूण ५७ लोखंडी पत्र्याचे बॅरल असे ११४०० लिटर ल्युब्रीकेटींग ऑईल तसेच गाळा नं. १२ मधील प्रत्येकी २०० लि. क्षमतेचे एकूण ५२ लोखंडी पत्र्याचे बॅरल असे एकूण १०४०० लिटर ल्युब्रीकेटींग ऑईलचा साठा जप्त करण्यात आला.

प्रस्तुत प्रकरणी पोलीसांनी धाड टाकून धाडीच्या ठिकाणी उपस्थित इसमास विचारणा केल्यानुसार, जप्त केलेल्या साठ्याबाबत परवाना नसल्याचे सांगीतल्याने सदर द्रवपदार्थाचा साठा पोलीसांनी जप्त केला. तथापी, सुनावणी दरम्यान साठ्याचे मालक यांनी सदर साठा खरेदी केल्याची बिले तसेच दि ल्युब्रीकेटींग ऑईल्स ॲण्ड ग्रीसेस (प्रोसेसिंग, सप्लाय,ॲण्ड डिस्ट्रीब्युशन रेग्युलेशन) ऑर्डर, १९८७ नुसार सदर साठ्याच्या व्यवसायाकरीता

आवश्यक असलेला सह संचालक उद्योग (एमएमआर) यांचेकडील परवाना क्र.बीएमआर/ल्युब ऑईल ग्रिसेस ऑर्डर/०२३६/८८, दि. ३०/०६/१९८८ अन्वये दि. ३०/०६/२०१३ पर्यंत वैध परवाना त्याचप्रमाणे दोन्ही गाळयामध्ये ल्युब ऑईलच्या साठवणुकीकरीता बृहन्मुंबई महानगर पालीका यांचेकडील दि. ०९/०२/२०१२ पर्यंत वैध असलेला स्वतंत्र परवाना सादर केला आहे.

प्रस्तुत गुन्ह्यात जप्त केलेल्या द्रवपदार्थाचे नमुने पोलीसांनी रासायनिक पृथ:करणासाठी न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेत पाठविले असता, सदर नमुन्यांचा पृथ:करण अहवाल Exhibit Nos. १, २ and ३ contain lubricating oil असा प्राप्त झालेला आहे. पृथ:करण अहवालाच्या अनुषंगाने जप्त साठ्याचे मालक यांनी सुनावणीचे वेळी सादर केलेल्या खुलाशात, सदर गुन्ह्यात जप्त केलेल्या मुद्देमालाच्या रासायनिक पृथ:करण अहवालात ल्युब्रीकेटींग ऑईल असे स्पष्ट नमुद केले असून, या गुन्ह्यात ऑईलमध्ये भेसळ करण्याचा अथवा काळाबाजार करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तरी जप्त केलेला ल्युब्रीकेटींग ऑईलचा संपुर्ण साठा परत मिळावा, असे नमुद केले आहे. तसेच सदरचा जप्त केलेला साठा अर्जदारास देण्यास पोलीसांची कोणतीही हरकत नसल्याचा अहवाल पोलीसांनी दिला आहे. प्रस्तुत प्रकरणी न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांनी दिलेला रासायनिक पृथ:करण अहवाल पहाता, सदर गुन्ह्यात जप्त केलेला द्रवपदार्थ ल्युब्रीकेटिंग ऑईल असल्याचे दिसून येत असून, त्या पदार्थात कोणतीही भेसळ नसल्याचे स्पष्ट होत आहे. तसेच साठ्याचे मालक यांनी, ल्युब्रीकेटींग ऑईलचा व्यवसायाकरीता आवश्यक असलेले परवाने संबंधित प्राधिकरणाकडून प्राप्त केले असल्याचे दिसून येते. सबब, सदरची बाब विचारात घेता गाळा नं ७ मधील प्रत्येकी २०० लिटर क्षमतेचे एकूण ५७ लोखंडी पत्र्याचे बॅरल असे ११४०० लिटर लुब्रिकेटिंग ऑईल तसेच गाळा नं. १२ मधील प्रत्येकी २०० लि. क्षमतेचे एकूण ५२ लोखंडी पत्र्याचे बॅरल असे एकूण १०४०० लिटर लुब्रिकेटिंग ऑईलचा साठा त्यांच्या मालकांस परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे आदेश देण्यापुरतेच सदरचे प्रकरण या कार्यालयाशी सीमित असून फौजदारी गुन्हा नोंद प्रकरणी संबंधित न्यायालयात योग्य तो निर्णय होईलच. सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये साकीनाका पोलिस स्टेशन, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ७/२०११, दि.०१/०२/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून खालील आदेश देत आहे.

0007

**आदेश :**

प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला गाळा नं ७ मधील प्रत्येकी २०० लिटर क्षमतेचे एकूण ५७ लोखंडी पत्र्याचे बॅरलमधील एकूण ११४०० लिटर ल्युब्रीकेटींग ऑईल तसेच गाळा नं. १२ मधील प्रत्येकी २०० लि. क्षमतेचे एकूण ५२ लोखंडी पत्र्याचे बॅरलमधील एकूण १०४०० लिटर ल्युब्रीकेटींग ऑईलचा साठा त्यांच्या मालकास परत करण्यात यावा.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) इस्तियाक अहमद अजिउल्ला सिद्दीकी
२) गाळा क्र. ७ व १२ चे मालक
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, साकीनाका पोलिस स्टेशन, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, साकीनाका पोलिस स्टेशन, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
OFFICE
AI